<u>नि.क्र.२६ वरील अर्ज मंजूर झाल्याने उलटतपास प्रतिवादीकरीता विधीज्ञ श्री. लिपटे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -

५. दाव्याबाबतची संपूर्ण माहिती मी स्वतः माझ्या वकिलांना दिली होती. मी दिलेल्या माहितीआधारे त्यांनी हा दावा आणि पुराव्याचे शपथपत्र तयार केले. हे म्हणणे खरे आहे की, सुरुवातीला या दाव्यामध्ये मी खोली क्र.४ चा उल्लेख केला होता. साक्षीदार स्वतः सांगतात की टंकलेखकाच्या चुकीमुळे खोली क्र.६ ऐवजी खोली क्र.४ असे नमूद करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, खोली क्र.४ ही कधीही या प्रतिवादीकडे भाडयाने नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात दिलेले मोजमाप १० X ११ हे खोली क्र.४ चे मोजमाप आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमूद दावा मिळकतीचे मोजमाप हे चुकीचे आहे.

६. "टी.एम. सोनार" या इमारतीमध्ये एकूण १३ खोल्या आहेत. साक्षीदार स्वतः सांगतात की, त्यांच्या हिश्यात या इमारतीमधील ९ खोल्या आहेत. उर्वरीत ४ खोल्या माझी भावजाई नामे आशा दत्तात्रय सोनार यांच्या मालकीच्या आहेत. प्रतिवादी ही आशा दत्तात्रय सोनार यांची भाडेकरु असल्याचे मी सांगू शकत नाही. दावा मिळकतीचे दरमहाचे भाडे प्रतिवादी ही आशा दत्तात्रय सोनार यांना अदा करत होती, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादीने दावा मिळकतीचे भाडे थकविल्याबाबत आशा दत्तात्रय सोनार हिने कधीही प्रतिवादीला नोटीस दिली नाही, याबाबत मला माहिती नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, "टी.एम. सोनार" या इमारतीचे मुळ मालक श्री.तोताराम महादू सोनार हे होते. दावा मिळकतीचा मी मालक झालो हे कळविण्याकरीता मी प्रतिवादीला कधीही attornment ची नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचा मालक झालो ही बाब मी प्रतिवादीला कधीही कळविली नाही. सदरची बाब मी प्रतिवादीला तोंडी कळविली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचा मालक झाल्याबाबत मी प्रतिवादीला तोंडी कळविल्याचे मी खोटे सांगतो.

नि.दि.दा.क्र.६३/२०२२
नि.क्र.२५

<u>न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलटतपास तहकूब.</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.09.09 17:34:06 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०८/०९/२०२५